## फॅक्स संदेश

| | | |
|---|---|---|
| प्रति | :- | मा. पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद. |
| माहितीस्तव | :- | १) मा. महासंचालक, अँन्टी करप्शन ब्युरो, म.रा. मुंबई. |
| | | २) मा. जिल्हाधिकारी औरंगाबाद, जि.औरंगाबाद |
| | :- | ३) मा.पोलीस अधीक्षक,औरंगाबाद (ग्रामीण) |
| | | ४) मा. अपर पोलीस अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद. |
| पासुन | :- | पोलीस उप अधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद. |

---

जा.क्रं.पोउपअ/ ऐसीबी/सा.के./औबाद/२०२१- औरंगाबाद, दि.१२ /११/२०२१

---

| | | | |
|---|---|---|---|
| १. | फिर्यादी | :- | श्री. विठ्ठल किसन पवार वय ३४ वर्ष, व्यवसाय-शेती रा. महालक्ष्मीखेडा ता.गंगापुर जि.औरंगाबाद मो.नं.८८०५१५४३८९ |
| २. | आरोपी | :- | श्री. हरीशचंद्र अशोक नरके, पोना/५४३ पो.स्टे.गंगापूर औरंगाबाद ग्रामीण, |
| ३. | पो.स्टे. गु.र.नं. | :- | गंगापूर औरंगाबाद (ग्रामीण) गुरनं- ४२५/२०२१ कलम ७,भ्र.प्र.अधिनियम १९८८ व कलम २०१ भा.द.वि. |
| ४. | गुन्हा घडला तारीख, वेळ व ठिकाण | :- | दिनांक ११/११/२०२१ रोजी ११.०७ ते ११.३८ वा.दरम्यान मौजे ढोरेगांव ता.गंगापूर जि.औरंगाबाद. |
| ५. | गुन्हा दाखल ता. वेळ | :- | दिनांक ११/११/२०२१ रोजी २२.०४ वाजता. |
| ६. | आरोपी अटक ता. वेळ | :- | दिनांक ११/११/२०२१ रोजी २३.११ वाजता |
| ७. | जप्त केलेल्या लाचेची रक्कम | :- | तक्रारदार यांचेकडे पडताळणी कामी देण्यात आलेले शासकिय डिजिटल व्हाईस रेकॉर्डर हस्तगत केले आहे. |

**खुलासा :-**

सादर विनंती की, यातील मुळ तक्रारदार श्री. विठ्ठल किसन पवार वय ३४ वर्ष, व्यवसाय-शेती रा.महालक्ष्मीखेडा ता.गंगापुर जि.औरंगाबाद यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ११/११/२०२१ रोजी लाच मागणीची पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक हरीशचंद्र अशोक नरके, पोना/५४३ पो.स्टे.गंगापूर औरंगाबाद ग्रामीण, यांनी तक्रारदार श्री. विठ्ठल किसन पवार यांना पंच साक्षीदारा समक्ष तक्रारदार यांचे विरुध्द पो.स्टे.गंगापुर येथे दाखल गुन्हयात मदत करणे व पो.स्टे.गंगापुर येथे जमा असलेली बुलेट मोटार सायकल सोडवुन देणे या कामासाठी दहा हजार रुपयाची लाच मागणी केल्यावर आलोसे यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने तक्रारदार यांची अंगझडती घेवुन त्यांचेकडे देण्यात आलेले डिजिटल व्हाईस रेकॉर्डर त्यांचे जॅकेट मधुन काढुन घेवुन त्यांना त्यांचे खाजगी वाहनात बसवुन घेवुन जावुन काही अंतरावर वाहनाचे खाली उतरवुन दिले व व्हाईस रेकॉर्डर सोबत घेवुन गेले. नमुद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन गुन्हयातील आरोपीतास अटक करण्यात आलेली आहे.

सदर गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक कु.शुभांगी सुर्यवंशी,ओ.सी.बी.औरंगाबाद या करीत आहेत.

सविनय सादर

१२/११/२१

(मारुती पंडीत)